# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

परिपत्रक क्र. ८०/२०२२

**विषय: विद्यापीठ विभागातील संशोधन केंद्रात बाह्य मार्गदर्शकांना संशोधन मार्गदर्शक म्हणून सहयोगी होण्याबाबतची मार्गदर्शक तत्वे.....**

विद्यापीठाच्या विविध विभागातील पीएच.डी. मार्गदर्शकांची उपलब्धता सध्या नवीन प्राध्यापक भरती बंद असल्याने पुरेशा संख्येत नाही. सदर कारणाने विद्यापीठ विभागात पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना संशोधन करण्यासंदर्भात येत असलेल्या अडीअडचणींचा विचार करून बाह्य मार्गदर्शक सहयोगी करून घेण्यासंदर्भात विचारविनिमय करून मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यासाठी गठित केलेल्या समितीच्या शिफारशीनुसार खालीलप्रमाणे मार्गदर्शक तत्वे निर्गमित करण्यात येत आहेत.

१. विद्यापीठ स्कुलमधील ज्या विभागामध्ये संबंधित विषयाच्या पीएच.डी. विषयनिहाय मार्गदर्शकांची संख्या तीन अथवा तीनपेक्षा कमी असल्यास त्या विभागाला त्या त्या विषयासाठी संलग्न महाविद्यालयातून वा व्यावसायिक आस्थापनांमधून एकत्रितपणे १० पर्यंत बाह्य पीएच.डी. मान्यताप्राप्त मार्गदर्शकांची नियुक्ती करता येऊ शकेल. विभागाबाहेरील पीएच.डी. मार्गदर्शकांपैकी ५०% मार्गदर्शक शैक्षणिक अथवा संशोधनपर संस्थामधून असावेत व ५०% औद्योगिक आस्थापनांमधील अथवा संशोधनपर संस्थामधून असावेत. अशा बाह्य पीएच.डी. मार्गदर्शकांनी पीएच.डी. चे विद्यार्थी स्वीकारल्यावर आठवड्यातून किमान दोन वेळा विभागात येऊन संशोधक विद्यार्थ्यांशी प्रत्यक्ष वा आभासी पद्धतीने संवाद साधणे बंधनकारक असेल. विद्यार्थी व मार्गदर्शक यांच्या संवादाची नोंद ठेवणे व नियमन करणे हि जबाबदारी त्या त्या विभागप्रमुखांची/स्कुलच्या संचालकांची असेल. अशा विभागाबाहेरील पीएच.डी. मार्गदर्शकांच्या संलग्नतेची शिफारस त्या विभागाची विभागीय समिती (Departmental Committee) करेल.

२. संलग्न पीएच.डी. मार्गदर्शकांच्या विद्यार्थ्यांच्या संशोधनासाठी आवश्यक संसाधने उपलब्ध करण्याची संयुक्त जबाबदारी बाह्य पीएच.डी. मार्गदर्शक व विद्यापीठ विभाग यांची असेल.

३. संबंधित विभागामध्ये बाह्य पीएच.डी. मार्गदर्शक म्हणून संलग्न होण्यासाठी त्या विभागाच्या विभागीय समितीची (Departmental Committee) शिफारस आवश्यक असेल. विभागीय समितीला दरवर्षी बाह्य पीएच.डी. मार्गदर्शकांच्या संशोधन कार्याचा आढावा घेऊन शिफारशींमध्ये योग्य ते फेरफार करण्याचा अधिकार असेल.

४. ज्या विभागात एखाद्या विषयात तीन पेक्षा अधिक मार्गदर्शक असतील अशा विभागांनी त्यांना औद्योगिक अथवा संशोधन क्षेत्रातील तज्ञ मान्यताप्राप्त मार्गदर्शक संलग्न करावयाचे असल्यास एकत्रितपणे कमाल १० पर्यंत मार्गदर्शक संलग्नित करून घेता येतील. सदर मार्गदर्शक संलग्नित करून घेण्यासाठी विभागीय समिती मार्फत विभागप्रमुख/स्कुल संचालकांनी मा.कुलगुरू यांची या बाबत विशेष परवानगी घ्यावी.

५. विद्यापीठ परिपत्रक क्र. २३१/२०२१ नुसार विहित केलेले नियम बाह्य पीएच.डी. मार्गदर्शकांकरिता लागू असतील.

उपकुलसचिव
शैक्षणिक प्रवेश

गणेशखिंड, पुणे ४११ ००७
संदर्भ क्र. शै.प्रवेश/१९४३
दिनांक : ०४/०४/२०२२

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-

१. मा.विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
२. मा.प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
३. मा.संचालक विद्यापीठ मान्यताप्राप्त सर्व संस्था, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

} आवश्यकतेनुसार विद्यापीठ विभागात सहयोगी होण्यास परवानगी देण्याबाबत कार्यवाहीसाठी.

Scanned by CamScanner